# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

दिनांकः16.08.2026 वारः रविवार

---

1. देशभरात 80वा  स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा, जगातील प्रमुख नेत्यांकडून भारताला शुभेच्छा
2. 80व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त यावर्षी पहिल्यांदाच जगातील 54 देशात 'सूर्यापथ तिरंगा ग्लोबल रिले' उपक्रम
3. माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या पुण्यतिथीनिमित्त विविध उपक्रमांद्वारे आदरांजली
4. भारत आणि श्रीलंका यांच्यातला पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारताची दमदार सुरुवात; देवदत्त पडीक्कलचं नाबाद शतक आणि
5. विश्वचषक हॉकी स्पर्धेत भारताची विजयी सलामी.

**<u>पंतप्रधान-स्वातंत्र्यदिन</u>**

देशभरात काल 80वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. दिल्लीतील ऐतिहासिक लाल किल्ल्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यदिन सोहळा पार पडला. लाल किल्ल्यावर पहिल्यांदाच 'वंदे मातरम' हे गीत सादर करण्यात आलं. आपल्या भाषणात पंतप्रधानांनी देशाला 'सप्त धारा' अर्थात शक्तीच्या सात प्रवाहांचा प्रभावी वापर करण्याचं आवाहन केलं.

या सात प्रवाहांमध्ये 'उत्पादन क्षेत्र' 'कृषी आणि अन्न उत्पादन', 'तंत्रज्ञान आणि नवोपक्रम', 'गती शक्ती', 'संरक्षण क्षमता', 'हरित अर्थव्यवस्था' आणि 'निळी अर्थव्यवस्था' अर्थात ब्लू इकॉनॉमी आणि 'सॉफ्ट पॉवर' अर्थात सांस्कृतिक आणि वैचारिक प्रभाव यांचा समावेश आहे.

**<u>सूर्यापथ तिरंगा</u>**

80व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त 'हर घर तिरंगा' मोहिमेचाच एक भाग म्हणून यावर्षी पहिल्यांदाच जगातील 54 देशात 'सूर्यापथ तिरंगा ग्लोबल रिले' हा उपक्रम भारत सरकारच्यावतीने राबवण्यात आला. काल स्वातंत्र्य दिनी अमेरिकेतील सॅन फ्रान्सिस्कोमधील भारताच्या वाणिज्य दूतावासाद्वारे ध्वजारोहण करून या रिलेची सांगता झाली. 54 देश आणि विविध कालक्षेत्रांतून प्रवास करत, पूर्वेकडील फिजीपासून पश्चिमेकडील अमेरिकेपर्यंतचा हा प्रवास पूर्ण झाला, अस परराष्ट्र मंत्रालयान सांगितल.

फिजीमधील भारताच्या उच्चायुक्तालयातून सुरू झालेल्या या उपक्रमातून एका सूर्योदयापासून दुसऱ्या सूर्योदयापर्यंत विविध देशांमध्ये भारतीय राष्ट्रध्वज फडकवण्यात आला. जगभरातील भारतीय समुदाय आणि भारताच्या मित्रराष्ट्रांना एकत्र आणण हा त्यामागचा मुख्य उद्देश होता. या सर्व उपक्रमात परदेशस्थ भारतीयांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. यामुळे त्यांची तिरंग्याशी भावनिक जवळीक होऊन भारताशी राष्ट्रभक्तीने जोडल्याची अनुभूती या उपक्रमाद्वारे घेता आली. तसेच, भारताच्या राष्ट्रीय भावनेच आणि अभिमानाच प्रतीक असलेल्या 'वंदे मातरम'चा चिरंतन वारसा साजरा करत, या रिलेद्वारे 'वंदे मातरम'ला 150 वर्षे पूर्ण झाल्याचेही अधोरेखित करण्यात आल.

**रुबियो-शुभेच्छा संदेश**

अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबिओ यांनी काल शुभेच्छा संदेशाद्वारे 80व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त भारताच्या नागरिकांना शुभेच्छा दिल्या.अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यातील वैयक्तिक संबंधांमुळे भारत-अमेरिका संबंध सातत्याने वृद्धिंगत होत आहेत आणि ते पूर्वीपेक्षा अधिक दृढ झाले आहेत, असं रूबिओ यांनी म्हटलं आहे.

भारताच्या 80 व्यास्वातंत्र्यदिनानिमित्त फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन, मालदीवचे राष्ट्राध्यक्ष डॉ. मोहम्मद मुइज्जू, नेपाळचे पंतप्रधान बालेन्द्र शाह, भूतानचे पंतप्रधान शेरिंग तोबगे आणि स्लोव्हाक प्रजासत्ताकचे राष्ट्राध्यक्ष पीटर पेलेग्रीनी आदि जागतिक नेत्यांनी भारताला शुभेच्छा दिल्या आहेत. भारताबरोबरच्या मैत्रीपूर्ण आणि द्विपक्षीय संबंधांबद्दलही त्यांनी सदिच्छा व्यक्त केल्या, असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या सर्व नेत्यांचे आभार मानले आहेत.

**राष्ट्रपती**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल 80व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त राष्ट्रीय युद्ध स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करून वीर जवानांना आदरांजली वाहिली.

**राष्ट्रपती**

स्वातंत्र्यदिनानिमित्त, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल राष्ट्रपती भवनात स्वागत समारंभाच आयोजन केल होत. यावेळी उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, माजी राष्ट्रपती रामनाथ कोविन्द तसच केंद्रीय मंत्री, प्रमुख राजकीय पक्षाचे नेते आणि सरकारी योजनांचे निवडक लाभार्थी उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्र, गोवा, मध्यप्रदेश आणि छत्तीसगड या राज्यातील पारंपरिक लोककलांच सादरीकरण करण्यात आल.

**मुख्यमंत्री-फडणवीस**

स्वातंत्र्यदिनानिमित्त मुंबईत मंत्रालयात झालेल्या मुख्य शासकीय समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. यावेळी मुख्यमंत्र्यांनी स्वातंत्र्यसंग्राम सेनानी, क्रांतिकारक आणि देशाच्या सीमांचं रक्षण करणाऱ्या जवानांना अभिवादन करत राज्यातील जनतेला स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. विकसित भारताच्या संकल्पनेत महाराष्ट्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, महाराष्ट्र हे देशाच्या विकासाचं 'ग्रोथ इंजिन' असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले

**पुण्यतिथी**

माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांची आज 8 वी पुण्यतिथी आहे. त्यानिमित्त देशभर त्यांना विविध उपक्रमांद्वारे आदरांजली वाहण्यात येत आहे. नवी दिल्लीत सदैव अटल या त्यांच्या समाधीस्थळी आज सकाळी सर्वधर्मीय प्रार्थना सभा होत असून काही वेळापूर्वी राष्ट्रपती द्रौपदी मुरमू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह सर्व प्रमुख नेत्यांनी अटलजींच्या समाधीवर पुष्पांजली अर्पण करून त्यांना आदरांजली वाहिली राष्ट्रीय स्तरावरील पदाधिकारी त्यांना आदरांजली अर्पण करणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अटलबिहारी वाजपेयी यांना त्याच्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन केल आहे. अटलजींनी आपल सर्व आयुष्य देशसेवेसाठी समर्पित केल. त्यांच्या सक्षम नेतृत्वाने आपल्या देशाला अधिक मजबूत बनवल अशा शब्दांत पंतप्रधानांनी समाजमध्यमाद्वारे प्रसिद्ध केलेल्या संदेशात आदरांजली वाहिली आहे .

**उपराष्ट्रपती**

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आजपासून तामिळनाडूच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर असून या दरम्यान ते चेन्नई, चेंगलपट्टू, तिरुवरूर आणि तंजावर इथ आयोजित विविध शैक्षणिक, स्मृतिपर आणि साहित्यिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होणार आहेत. आज चेंगलपट्टू इथ 'एसआरएम इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी'च्या 22 व्या दीक्षांत समारंभाला उपराष्ट्रपती उपस्थित राहतील.

**अमित शहा**

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा आज राजस्थान दौऱ्यावर असून राजस्थानमधील अलवर इथ 'अलवर सरस डेअरी कॉम्प्लेक्स'मध्ये एका नवीन दुग्ध प्रकल्पाची पायाभरणी तसेच विविध दुग्ध संघांच्या प्रक्रिया प्रकल्पांचे आणि पशुखाद्य निर्मिती प्रकल्पांचे 'ई-उद्घाटन' करणार आहेत. या कार्यक्रमात राजस्थानमधील 17 जिल्ह्यांमधील 6 हजार 262 कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांची 'ई-पायाभरणी' आणि 'ई-उद्घाटन' देखील शहा यांच्या हस्ते होणार आहे.

**बलुचिस्तान**

बलुच नेते मीर यार बलुच यांनी पाकिस्तानी लष्करावर युद्धगुन्हे केल्याचा आणि नागरिकांना लक्ष्य केल्याचा आरोप केला आहे. सुरबमधील 'गिदार गोंधन' भागात मंगळवारी पाकिस्तानी लष्कराने केलेल्या कारवाईबाबत आंतरराष्ट्रीय फौजदारी न्यायालयात दाद मागणार असल्याचं मीर यार बलुच यांनी समाजमाध्यमांवर म्हटलं आहे. या कारवाईत महिला, मुले आणि लहान बालकांसह 30 नागरिकांचा मृत्यू झाला होता. दरम्यान, पाक व्याप्त जम्मू-काश्मीरमधील परिस्थिती तणावपूर्ण आहे.

**हॉकी**

नेदरलँड्समध्ये सुरू झालेल्या विश्वचषक हॉकी स्पर्धेत भारतानं वेल्सवर मात करत विजयी सलामी दिली आहे. नेदरलँड्समधील ॲमस्टेलवीन इथं झालेल्या एफआयएच हॉकी विश्वचषकाच्या ड गटातील सामन्यात भारतानं काल वेल्सचा 3-1 असा पराभव केला.

भारताकडून कर्णधार हरमनप्रीत सिंगनं दोन तर संजय राणानं एक गोल केला.

**क्रिकेट**

पुरुष क्रिकेटमध्ये, भारत- श्रीलंका दरम्यानच्या पहिल्या कसोटी सामन्यात काल पहिल्या दिवसाचा खेळ थांबला तेव्हा भारताची धावसंख्या 2 बाद 288 होती. तत्पूर्वी, भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. देवदत्त पडीक्कलनं नाबाद 131 धावा केल्या तर के. एल. राहुल 77 धावांवर असताना दुखपतीमुळं निवृत्त झाला.

**हवामान**

भारतीय हवामान विभागाने आज अरुणाचल प्रदेश, पश्चिम बंगाल, ओडिशा, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडमधील काही भागांत अतिवृष्टीचा अंदाज वर्तवला आहे. तसेच, ईशान्य भारत, छत्तीसगड, गुजरात, हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीर, लडाख, गिलगिट-बाल्टिस्तान, झारखंड, कोकण-गोवा, मध्य महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशातील काही भागांतही दिवसभरात मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता आहे. अंदमान आणि निकोबार बेटे, आंध्र प्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि कराईकल या भागांत आज मेघगर्जनेसह विजांच्या कडकडाटाची शक्यताही हवामान विभागाने वर्तवली आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार.